# 3 फेब्रुवारी

**आजचा सुविचार :**

"भरलेला खिसा माणसाला दुनिया दाखवतो, रिकामा खिसा मात्र दुनियेतील माणसं दाखवतो."

**आजचे पंचांग :**

वार – गुरुवार    मास - माघ    नक्षत्र – शततारका

सूर्योदय – सकाळी 7.02 वाजता    सूर्यास्त – सायंकाळी 6.29 वाजता

**आजचे दिनविशेष :**

1934 : ला आजच्या दिवशी विमानाने पार्सल पाठविण्याची सेवा सुरु झाली.

1925 : ला आजच्या दिवशी मुंबई पासून कुर्ला पर्यंत पहिल्यांदा इलेक्ट्रिक वर चालणारी रेल्वे आज धावली.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) Farm – शेत 2) fast - वेगवान    3) fear – भीती    4) fly – उडणे    5) forest – वन

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) एक हजारामध्ये किती शून्य असतात?    2) निरोगी प्रौढ व्यक्तीमध्ये किती दातअसतात?

3) जगातील सर्वात मोठा महासागर कोणता?    4) इलेक्ट्रिक बल्बचा शोध कोणी लावला?

**बोधकथा :**

## संकटातील बढाई

एकदा एक मुंगी आपले खाद्य शोधत फिरत असता कोशातून नुकताच एक किडा बाहेर पडलेला तिला दिसला. कोशातून बाहेर पडलेले त्याचे पाय तो हळूहळू हालवीत होता. ते पाहून मुंगी म्हणाली, 'अरेरे, काय ही तुझी स्थिती ? मला वाटेल तिकडे फिरता येतं. पण तुला या कोशात बंदीवान होऊन दिवस काढावे लागतात. तेव्हा तुझ्या व माझ्या स्थितीत फारच अंतर आहे असं म्हटले पाहिजे.' यावर किडा काहीच बोलला नाही. पुढे काही दिवसांनी ती मुंगी पुन: तेथे गेली असता त्या किड्याचे फक्त कवच मात्र तेथे पडले असून तो किडा कोठेतरी निघून गेला आहे असे तिला दिसते. ती इकडे तिकडे फिरत आहे तोच एक सुंदर पतंग आपल्या पंखांनी तिला वारा घालत असताना तिला दिसला. तो तिला म्हणाला, 'अग, त्या दिवशी बंदिवान म्हणून तू माझी कीव करीत होतीस, माझ्यापेक्षा तुझी स्वत:ची स्थिती बरी असं म्हणत होतीस, तोच कोशातला किडा मी आहे हे लक्षात घे. आपल्याला वाटेल तिकडे फिरता येतं अशी बढाई मारायची असेल तर खुशाल मार. तोपर्यंत मी सहज थोडा आकाशात फिरून येतो.' इतके बोलून त्याने एक भरारी मारली व उंच आकाशात गेला.

**तात्पर्य-** संकटात असलेला माणूस पुन: कधीही वर डोके काढणार नाही अशा समजुतीने त्याचा उपहास करून त्याच्याजवळ स्वत:च्या वैभवाबद्दल बढाई मारणे हा मूर्खपणा होय.

Kitestudy.blogspot.com